संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# परीक्षा सर्वस्व नव्हे एक निमित्त

**मार्च** महिन्यापासून परीक्षांचा हंगाम सुरु होतो. आणि यात दहावी बारावी या दोन परीक्षा सर्वात महत्त्वाच्या ठरतात. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळांकडून घेतल्या जाणाऱ्या परीक्षांच्या निकालांवर अक्षरशः लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य अवलंबून असते. आपल्या भारतीय शिक्षण पध्दतीत या दोन परीक्षांना दिले गेलेले महत्त्व किंवा या परीक्षांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या आवडीच्या विषयात पुढचा अभ्यास करून करियर करण्याची संधी दिली जाते. म्हणजे आयुष्यातील पुढच्या मार्गक्रमणाची निश्चिती या दोन परीक्षांमधून होते. स्वाभाविकपणे या परीक्षांचा धसका विद्यार्थी तर घेतातच. पण संपूर्ण वर्षभर ते कुटुंबदेखील तणावाखाली असते. वास्तविक आता तणाव असण्याचे काहीच कारण नाही. परंतु गेल्या काही वर्षातला या परीक्षांविषयी समाजमनावर असलेला प्रभाव एकुण शिक्षण , अभ्यास, करियर, आणि कौटुंबिक परिस्थिती अशा गोष्टीविषयी विशेष लक्ष वेधणारा ठरतो. प्रचंड प्रमाणात असलेली उच्च शिक्षणातली स्पर्धा या मुद्दांचा विचार करायला भाग पाडते. आपल्याला अपेक्षित असलेल्या विषयांचा अभ्यास करण्याकरीता नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळाला पाहिजे. हा प्रवेश गुणवत्तेतून मिळावा असाही आग्रह दिसून येतो. परंतु गुणवत्ता नसेल तर देणगी किंवा जादा शुल्क भरून आपल्याला हव्या त्याच महाविद्यालयात आणि हव्या त्याच विषयासाठी प्रवेश घेण्याचा हट्टही पाहायला मिळतो. मग असा प्रवेश न मिळणे त्यासाठी ज्यादा पैसा खर्च करावा लागणे आणि मग स्वाभाविकपणे पालकांच्या अपेक्षा पूर्ण करता येत नसल्याने विद्यार्थ्यांच्या मनावर दडपण येणे या गोष्टीही घडतात. चांगल्या करियरकरिता चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळावा आणि अशा प्रवेशाकरीता चांगले मार्कही मिळावेत. अशी ही शृंखला पाहायला मिळते. किंबहुना त्याचा एक नकळतपणे चक्रव्यूह तयार होतो. या परीक्षांमधून अभ्यासाचा आनंद घेण्याऐवजी उत्तीर्ण होण्याचे अनाठायी दडपण निर्माण होते. ते कमी करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. नुकत्याच सुरू झालेल्या शालांत परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी त्याचे मनावर दडपण न घेता ही परीक्षा दिली पाहिजे. दुर्दैवाने शाळांमधून आणि घराघरातून या परीक्षेचा जो काही बाऊ केला जातो. त्यामुळे निखळ यशापेक्षा उत्तीर्ण होण्याचा किंवा गुणवत्तेचा पराकोटीचा आग्रह पाहायला मिळतो.

### अनाठायी ताण

या सर्व कारणांमुळेच हल्ली परीक्षा म्हटल्यानंतर निर्माण होणारा ताण केवळ गैरसमजांमुळेच असल्याचे सिध्द होते. या परीक्षेच्या कालावधीत विद्यार्थ्यांनी आपण यश मिळवण्यासाठी प्रयत्न करीत आहोत एवढेच भान ठेवले पाहिजे. यामध्ये किती गुण मिळतील याची चिंता करण्याचे कारण नाही. परीक्षा हा आपल्या संपूर्ण आयुष्यातला एक छोटासा भाग असतो. परंतु त्याला सर्वाधिक महत्त्व दिले जाते. आणि मग त्यात मिळणाऱ्या यशापयशातून वेगवेगळे अर्थही काढले जातात. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडत्या क्षेत्रात शिकता आले पाहिजे. यासाठी परीक्षेत यश मिळावे हे तर ओघाने येतेच. परंतु परीक्षेशिवाय आपण आपल्या आवडीच्या क्षेत्रातही करियर करू शकतो. दुर्दैवाने अशा सकारात्मक पध्दतीने परीक्षा या प्रकाराची मांडणी केली जात नाही. त्यातून मग विद्यार्थी या परीक्षेचे विनाकारण दडपण घेतात. याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे विद्यार्थ्यांना परीक्षा देताना अभ्यासाचे ओझे तर असतेच. त्याशिवाय घरातल्या लोकांच्या अपेक्षांचे ओझे घेऊनही परीक्षा द्याव्या लागतात. अनेकवेळा तर विद्यार्थ्यांचा कल किंवा आवड पाहिली जात नाही. आई वडिलांच्या इच्छेनुसार विद्यार्थ्यांना अभ्यासही लादून घ्यावा लागतो. या सर्व गोष्टींच्या एकत्रित परिणामातूनच विद्यार्थ्यांच्या मनावर ताण निर्माण होत असतो. तो दूर करण्याचे कामदेखील शाळांमधून आणि पालकांकडून व्हायला हवे. हा ताण जेवढा हलका होईल तितके विद्यार्थ्यांना यश मिळवणे सोपे जाते. किंवा त्यांचा अभ्यासातला उत्साहदेखील वाढू शकतो. परीक्षेतील यश म्हणजे यशस्वी आयुष्य असे जे काही समिकरण तयार झाले आहे. ते बदलले पाहिजे. परीक्षा हा केवळ संपूर्ण जीवनातला एक टप्पा असतो. तो पार करताना यश आले तर ठीक. नाही आले तरी निराश होण्याचे कोणतेही कारण नसते.

### पालकांची प्रतिष्ठा

विशेषतः पालकांकडून विद्यार्थ्यांना या गोष्टी आत्मियतेने समजावून सांगण्याची गरज आहे. दहावी बारावीच्या परीक्षांसाठी महागडे क्लासेस लावले जातात. खाजगी शाळांची फीदेखील भरमसाठ असते. आणि आपल्यासाठी आईवडिलांनी केलेला हा खर्च वाया जाऊ नये अशीही एक भावना विद्यार्थ्यांमध्ये तयार होते. त्याबाबत पालकांनीच पुढाकार घेऊन त्याचे निरसन केले पाहिजे. अनेकवेळेला अनेक पालक आपल्या मुलांच्या यशाचा संबंध स्वतःच्या प्रतिष्ठेशी लावतात आणि मग त्यातूनच आपला मुलगा हुशार असला पाहिजे किंवा त्याला चांगलेच गुण मिळाले पाहिजेत, अशी त्यांची अपेक्षा असते. परंतु एकूण समाजाचा विचार करताना साठ टक्के विद्यार्थी हे अतिशय सामान्य आर्थिक परिस्थितीतले असतात. अनेकांना महागडे क्लासेस लावता येत नाहीत. आई वडिलांच्या तुटपुंज्या कमाईतून त्यांना शिकावे लागते. दहा बाय दहाच्या खोलीत अभ्यास करून ते परीक्षा देतात. अशावेळी त्यांना या परीक्षेचा बाऊ करता येत नाही. त्यांनी केलेले प्रयत्न हीच त्यांच्या यशाची फुटपट्टी किंवा तेच त्यांचे यश असते. अभ्यासासाठी परिस्थिती अनुकूल असो किंवा प्रतिकूल असो प्रयत्न जर योग्य असतील तर यश मिळणारच असते. आणि या यशाचे निमित्त केवळ परीक्षा असते एवढे लक्षात घेतले पाहिजे. म्हणूनच परीक्षा हे सर्वस्व नाही तर ते एक निमित्त असते. ही भावना जर वाढीला लागली तर परीक्षेतल्या काळातले तणाव कमी होऊ शकतील आणि निकालानंतरचे विद्यार्थ्यांमधले नैराश्यदेखील टाळता येऊ शकते.